# आकाशवाणी पुणे
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 9 वा 20 मि.

**दिनांक: 23.04.2021** **वार: शुक्रवार**

**कोरोनाचा प्रादुर्भाव पुन्हा वाढतो आहे. त्यामुळे सर्वांनीच सुरक्षा उपायांचं पालन करावं आणि पात्र नागरिकांनी न घाबरता लसीकरण करून घ्यावं, असं आवाहन करत आहोत. सुक्षित राहा आणि कोरोना संसर्ग रोखण्यासाठी मास्क वापरा, हात वारंवार स्वच्छ धुवा आणि सुरक्षित अंतर राखा.**

1. कोविड स्थिती बिकट असलेल्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी आज पंतप्रधानांची चर्चा
2. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुक प्रचारात रोड शो, पदयात्रा, सायकल किंवा बाईक रॅली आयोजित करण्यास मनाई
3. महाराष्ट्रातल्या पालघर जिल्ह्यात विरार इथं एका रुग्णालयाला लागलेल्या आगीत 13 रुग्णांचा होरपळून मृत्यू,
4. संगीतकार श्रवण राठोड यांचं कोरोना संसर्गामुळं मुंबईत निधन झालं आणि
5. पोलंड मध्ये झालेल्या जागतिक युवा मुष्टीयोद्धा अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय महिला मुष्टियोद्ध्यांनी इतिहास घडवला.

**बैठक**

देशातल्या कोरोना परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आज उच्चस्तरीय बैठका घेणार आहेत. या बैठकांसाठी त्यांनी, विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आखलेला पश्चिम बंगालचा आजचा दौराही त्यांनी रद्द केला आहे.

आज सकाळी एका अंतर्गत बैठकीत प्राथमिक आढावा घेतल्यानंतर पंतप्रधान मोदी हे कोरोना संसर्गाची बिकट स्थिती असलेल्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी दूर दृश्य प्रणालीद्वारे चर्चा करणार आहेत. यानंतर ते दुपारी, देशातील आघाडीच्या ऑक्सिजन उत्पादकांशीही बोलणार आहेत.

**निवडणूक आयोग सूचना**

पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी अनेक राजकीय पक्ष कोरोना नियमांचं पालन करत नसल्याचं लक्षात आल्यानं निवडणूक आयोगानं राज्यात रोड शो, पदयात्रा, सायकल किंवा बाईक रॅली आयोजित करण्यास मनाई केली आहे. तसंच, सार्वजनिक सभांमध्ये 500 पेक्षा अधिक जणांच्या उपस्थितीवर बंदी घालण्यात आली आहे. हे नियम निवडणूक संपेपर्यंत लागू असतील, असं आयोगानं काल जारी केलेल्या आदेशात म्हटलं आहे. या नियमांचं काटेकोरपणे पालन करण्याचं आवाहन त्यांनी राज्यातल्या सर्व राजकीय पक्षांना केलं आहे.

**तृणमूल सभा**

पश्चिम बंगालमध्ये कोरोना संसर्ग वाढल्यानं आणि निवडणूक आयोगानं काढलेल्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर तृणमूल कॉंग्रेस पक्षाच्या नेत्या आणि मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी त्यांच्या सर्व नियोजित सभा रद्द केल्या आहेत. विधानसभा निवडणुकीच्या उर्वरित दोन टप्प्यांमध्ये प्रचारासाठी त्या मतदारांशी दूर दृश्य प्रणालीच्या माध्यमातून संपर्क साधणार असल्याचं ट्विट ममता यांनी काल केलं. पंतप्रधान पश्चिम बंगालमधील वीरभूम, कोलकाता, मालदा आणि मुर्शिदाबाद इथल्या मतदारांशी दुरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून संवाद साधणार आहेत.

**रुग्णालये सूचना**

रुग्णालयात उपचार घेत असलेल्या 18 वर्षांवरील कोरोना रुग्णांच्या व्यवस्थापनासाठी आरोग्य मंत्रालयानं सुधारित मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. लक्षणं दिसू लागल्यावर 10 दिवसांच्या आत ऑक्सिजनची आवश्यकता भासणाऱ्या मध्यम ते गंभीर स्थितीत असलेल्या रुग्णांनाच रेमडेसिव्हीर इंजेक्शन देण्याचा विचार करावा, असं या सूचनेत म्हटलं आहे. मूत्राशय किंवा यकृताचे गंभीर आजार असणाऱ्यांना रुग्णांवर रेमेडेसिव्हीरचा वापर न करण्याचा सल्लाही आरोग्य मंत्रालयानं दिला आहे. याशिवाय, ऑक्सिजन पुरवठ्याची आवश्यकता नसलेल्या रुग्णांनाही हे इंजेक्शन दिलं जाऊ नये, असं आदेशात म्हटलं आहे. आरोग्य मंत्रालयानं टॉसिलीझुमॅब या औषधाबाबत आणि प्लाझ्मा वापराबाबतही मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.

**विरार आग**

नाशिक येथे ऑक्सिजनच्या गळतीमुळे 24 रुग्णांना आपले प्राण गमावल्याची घटना ताजी असतानाच विरार इथं एका रुग्णालयाला लागलेल्या आगीत 13 रुग्णांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. विरार पश्चिम इथल्या विजय वल्लभ रुग्णालयातल्या अतिदक्षता विभागाला मध्यरात्रीनंतर आग लागली होती. यामध्ये 13 कोरोनाबाधित रुग्णांचा मृत्यू झाला आहे. चार मजली असणाऱ्या या रुग्णालयाच्या दुसऱ्या मजल्यावर ही आग लागली होती. या आगीत रुग्णालयातील 17 रुग्ण अडकले होते. दरम्यान, अग्निशमन दल आणि पोलिसांनी आगीवर नियंत्रण मिळवलं आणि त्यांची सुटका करण्यात आली. तर बचावलेल्या रुग्णांना दुसऱ्या ठिकाणी हलवण्यात आलं आहे. या दुर्घटनेनंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी वसई विरार महापालिकेच्या आयुक्तांकडून याबाबतची माहिती घेतली असून चौकशीचे आदेश दिले आहेत.

**नाशिक दुर्घटना न्यायालय**

नाशिकमधल्या ऑक्सिजन गळतीमुळं झालेल्या दुर्घटनेची मुंबई उच्च न्यायालयानं स्वत: हून दखल घेत राज्य सरकारकडून घटनेची माहिती देणारा अहवाल मागवला आहे. चार मे पर्यंत हा अहवाल सादर करायचा असून त्यात या दुर्घटनेमागील कारणांचं स्पष्टीकरण असावं, असे आदेश न्यायालयानं ॲडव्होकेट जनरल आशुतोष कुंभकोणी यांना दिले आहेत. रुग्णालयातल्या ऑक्सिजनच्या टाकीत वायू भरला जात असताना व्हाल्वमधून गळती होत असल्याचं लक्षात आलं, मात्र ती दुरुस्ती करेपर्यंत ऑक्सिजनचा दाब कमी होऊन पुरवठा पुढील 20 मिनिटांपर्यंत थांबला, अशी प्राथमिक माहिती कुंभकोणी यांनी न्यायालयात सांगितली.

**सर्वोच्च न्यायालय**

वैद्यकीय वापरासाठीचा ऑक्सिजन आणि आवश्यक औषधांचा पुरवठा, तसंच कोविड लसीकरण या विषयांवर राष्ट्रीय धोरण तयार करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने काल केंद्राला दिले. देशातील कोरोनाच्या गंभीर परिस्थितीची स्वत:हून दखल घेत सरन्यायाधीश न्यायमूर्ती शरद बोबडे यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठानं हे निर्देश दिले आहेत. कोविड साथी दरम्यान टाळेबंदी लावण्याबाबत उच्च न्यायालयांना अधिकार आहे का याची तपासणी केली जाईल असंही या खंडपीठानं म्हटलं आहे.

**कोविड विमा-अर्थमंत्री**

कोविड-19 उपचाराधीन रुग्णांना रोकडविरहित विमा सुविधा सुनिश्चित करावी, अशी सूचना केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी विमा प्राधिकरणाला केली आहे. काही रुग्णालये रोख रक्कम विरहित विमा देत नसल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर सीतारामन यांनी काल विमा प्राधिकरणाचे अध्यक्ष एस सी खुंतीया यांच्याशी संवाद साधला.

गेल्या मार्च महिन्यात कोविड-19 आजाराचा सर्वसमावेशक विमा सुविधा आणि रोखरक्कम विरहित सेवांमध्ये समावेश करण्यात आला आहे. तात्पुरत्या स्वरुपांतील रुग्णालयांमध्येही ही सुविधा उपलब्ध आहे. आतापर्यंत 8 हजार 642 कोटी रुपयांच्या एकंदर 9 लाख विमा सुविधा कोविड रुग्णांसाठी उपलब्ध करुन देण्यात आल्या असल्याची माहितीही सीतारामन यांनी दिली आहे.

दरम्यान, मागणी आणि पुरवठ्यात समतोल साधण्यासाठी केंद्र सरकार सर्व राज्ये, रुग्णालयं, ऑक्सिजन आणि लस उत्पादक यांच्याशी समन्वय साधून असल्याचं सीतारामन यांनी काल पीएचडी चेंबर ऑफ कॉमर्सच्या दुरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून झालेल्या बैठकींत सांगितलं. या कोरोना परिस्थितीवर मात करण्यासाठीच्या उपाययोजनांवर पंतप्रधान स्वत : लक्ष ठेवून असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**देश लसीकरण**

भारतात आतापर्यंत कोरोना प्रतिबंधक लशींच्या 13 कोटी 54 लाख 78 हजार 420 मात्रा देण्यात आल्याचं आरोग्य मंत्रालयानं काल सांगितलं. यामध्ये लशीची पहिली मात्रा घेतलेल्या सुमारे 92 लाख, तर दुसरी मात्रा घेतलेल्या 59 लाखहून अधिक आरोग्य कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. देशात आतापर्यंत 1 कोटी 17 लाखांहून अधिक आघाडीवरील योद्ध्यांना लशीची पहिली मात्रा, तर 60 लाखांहून अधिक आघाडीवरील योद्ध्यांना लशीची दुसरी मात्रा देण्यात आली आहे. काल दिवसभरात 31 लाख 47 हजार 782 जणांना लस देण्यात आली.

**अमरनाथ यात्रा**

वाढत्या कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर 1 एप्रिलपासून सुरु झालेली यावर्षासाठीच्या अमरनाथ यात्रेसाठीची नोंदणी प्रक्रिया तात्पुरती स्थगित करण्यात आली असल्याची माहिती अमरनाथ मंदिर समितीनं ट्विटर संदेशात दिली आहे. या कोरोना संसर्गाच्या

परिस्थितीवर मंदिर समिती लक्ष ठेवून आहे, परिस्थितीत सुधारणा झाल्यावर ही नोंदणी प्रक्रिया पुन्हा सुरु केली जाईल, असं या संदेशांत म्हटलं आहे. 56 दिवसांची ही यात्रा यावर्षी 28 जून ते 22 ऑगस्ट या कालावधीत होणार आहे.

**ड्रोन**

कोरोना प्रतिबंधक लशींच्या वितरणाचा अभ्यास करण्यासाठी ड्रोनचा वापर करण्यास नागरी विमान वाहतूक आणि नागरी विमान वाहतूक महासंचालनालयानं भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेला परवानगी दिली आहे. कानपूर इथल्या आयआयटीच्या सहकार्यानं हा अभ्यास केला जाणार आहे. ही सवलत एका वर्षासाठी देण्यात आली आहे.

**अमेरिका पर्यावरण**

पर्यावरण बदलाच्या समस्येचा सामना करण्याचा एक भाग म्हणून 2024 पर्यंत विकसनशील देशांना सध्या दिल्या जात असलेल्या पर्यावरण निधीच्या रकमेत दुपटीनं वाढ करण्याचा अमेरिकेचा विचार असल्याचं या देशाचे अध्यक्ष ज्यो बायडन यांनी काल सांगितलं. संयुक्त राष्ट्रांतर्फे नोव्हेंबर महिन्यात होणाऱ्या 26 व्या जागतिक पर्यावरण परिषदेत नवीन पर्यावरण धोरण जाहीर करणार असल्याचंही बायडन यांनी सांगितल्याचं व्हाईट हाउसने प्रसिध्द केलेल्या पत्रकात म्हटलं आहे. अमेरिकेच्या विकास धोरणात प्रथमच पर्यावरण या मुद्द्याचा समावेश केला जाणार आहे.

**श्रवण**

संगीतकार श्रवण राठोड यांचं कोरोना संसर्गामुळं काल मुंबईत निधन झालं, ते 66 वर्षांचे होते. संगीतकार नदिम-श्रवण जोडीनं आशिकी, साजन, हम है राही प्यार के, परदेश, राजा हिंदुस्तानी यासह अनेक चित्रपटांना संगीत दिलं आहे. सर्वोत्कृष्ट संगीतकारासाठीचा फिल्मफेअर पुरस्कार सलग तीन वेळा मिळवण्याचा मान नदीम-श्रवण जोडीच्या नावावर आहे.

**बॉक्सिंग**

पोलंड इथं झालेल्या जागतिक युवा मुष्टीयोद्धा अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय महिला मुष्टियोद्ध्यांनी एकूण सात सुवर्ण पदकं जिंकत इतिहास घडवला. आपापल्या वजनी गटात अंतिम फेरीत गेलेल्या गीतिका, नाओरेम चानू, पूनम, विंका, अरुंधती चौधरी, टी. सनमाचा चानू आणि अलफिया पठाण यांनी विजय मिळवला. याशिवाय, भारताला तीन कांस्य पदकंही मिळाली आहेत.

---

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार